# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः16.11.2025** **वारःरविवार**

---

1.राज्याच्या उद्योग विभागाचा दोन कंपन्यांसोबत 3 हजार कोटींचा करार

2.आंतरराष्ट्रीय व्यापार मेळ्यात 'महाराष्ट्र दिन' दिमाखात साजरा

3.नवलेपुल अपघाताच्या पार्श्वभूमीवर वाहनांची गती प्रति तास 30 किलोमीटर करण्यासह विविध उपाय

4.त्रिभाषा धोरणासंदर्भात प्रश्नावली आणि मतावली भरुन देण्याचं सर्व सुजाण नागरिकांना आवाहन

5.रत्नागिरी जिल्हयातील सर्व पोलिस स्थानकांना स्मार्ट मानांकन आणि

6.दक्षिण आफ्रिकेविरुद्ध कोलकाता कसोटी जिंकण्याची भारताला संधी

**<u>करार</u>**

दळणवळणाच्या उत्तम सोयींसह लॉजिस्टिक दर कमी करण्यासाठी राज्य शासन प्रयत्न करत असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल नागपूर इथं सांगितलं. राज्याच्या विविध भागात गुंतवणुकीसाठी उद्योग विभागानं एक्स एस आय ओ इंडस्ट्रीज आणि ब्लॅकस्टोन कंपनीसोबत 3 हजार कोटी रुपयांच्या सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली, त्यावेळी ते बोलत होते. समृद्धी महामार्गालगत एक्स एस आय ओ कंपनीच्या लॉजिस्टिक पार्कचं उद्घाटन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाले. जागतिक दर्जाच्या या पार्कमध्ये 700 कोटी रुपये गुंतवणूक अपेक्षित आहे.

**<u>मेळा</u>**

नवी दिल्लीत भरलेल्या 44 व्या भारतीय आंतरराष्ट्रीय व्यापार मेळ्यात काल 'महाराष्ट्र दिन' अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. राज्याच्या मातीतील कलांचं मनोहारी दर्शन यावेळी उपस्थितांना घडविण्यात आलं. महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विकास पानसरे यांनी या सोहळ्याचं उद्घाटन केलं. नृत्य दिग्दर्शक संदेश पाटील यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या 'लोकरंग महाराष्ट्राचे' या कार्यक्रमात 50 हून अधिक कलावंतांनी सहभाग घेतला. या रंगारंग कार्यक्रमात बाळ शिवाजी जन्मोत्सव, राज्याभिषेक यांसारख्या ऐतिहासिक क्षणांसह शेतकरी नृत्य, वाघ्या मुरळी, गोंधळ, जोगवा, आदिवासी ठाकर नृत्य, लावणी आणि कोळी नृत्य यांसारख्या विविध लोककलांना रसिकांनी भरभरून प्रतिसाद दिला. कार्यक्रमाची सांगता महाराष्ट्राच्या राज्य गीतानं झाली.

**<u>बिरसा मुंडा जयंती</u>**

भगवान बिरसा मुंडा यांच्या 150 व्या जयंतीनिमित्त काल देशभरात विविध उपक्रमांच्या माध्यमातून त्यांना मानवंदना देण्यात आली. यंदाचं वर्ष ‘जनजातीय वर्ष’ म्हणून साजरं करण्यात येत आहे.

नागपूर जिल्ह्यातल्या मानकापूर इथं आयोजित तीन दिवसांच्या राज्यस्तरीय आदिवासी सांस्कृतिक महोत्सवाचं उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झालं. आदिवासी विकास विभागाच्या वतीनं आयोजित या कार्यक्रमाला केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची प्रमुख उपस्थिती होती.

देशाच्या विकासात आदिवासी समाजाचं मोठं योगदान आहे. भगवान बिरसा मुंडा हे या समाजाच्या अभिमान आणि स्वाभिमानाचे प्रतिक आहेत. आदिवासींच्या विकासासाठी काम होणं गरजेचं आहे असं सांगत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी म्हणाले...

गडकरी Byte

**<u>नवले पूल उपाययोजना</u>**

पुण्यातील नवले पूल परिसरात अपघात थांबविण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करणं गरजेचं आहे. त्याला वेळ लागत असल्यास अपघात रोखण्यासाठी तातडीनं करावयाच्या उपाययोजनांची जबाबदारी संबंधित यंत्रणांवर सोपवली आहे. त्यानुसार अल्पकालीन उपाययोजना त्वरित अमलात आणाव्यात, असे निर्देश केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी काल दिले. नवले पूल इथं झालेल्या अपघाताच्या पार्श्वभूमीवर मोहोळ यांनी काल विविध यंत्रणांच्या प्रमुख अधिकाऱ्यांची बैठक घेतली त्यावेळी हे निर्देश दिले.

महामार्गावर आता स्पीड गनची संख्या वाढवून 6 करावी, वाहनांची वेगमर्यादा प्रति तास 60 ऐवजी 30 किलोमीटर करावी.

प्रादेशिक परिवहन विभागामार्फत खेड शिवापूर पथकर नाक्यावर जड आणि अवजड वाहनांतील अतिभार, ब्रेक तसंच इतर तांत्रिक बाबींची तपासणी करावी. या वाहनांच्या चालकांनी नियमांचं उल्लघंन केल्यास पुढील नाक्यावर त्यांना दंड करण्यात येईल.रस्त्यावर रिफ्लेक्टर्सच्या संख्येत वाढ करावी.

रस्त्यावरील प्रवाशांची गर्दी कमी करण्याकरिता 'पीएमपीएल'ने जागा निश्चित करुन अधिकृत बस थांबे करावेत इत्यादी निर्देश या बैठकीत देण्यात आले.

**<u>वॉका</u>**

**<u>इंट्रो-</u>**

राज्य सरकारनं नेमलेल्या त्रिभाषा धोरण समितीनं या धोरणासंदर्भात सर्व स्तरातील लोकांच्या अपेक्षा जाणून घेण्यासाठी प्रश्नावलीचे चार पर्याय आपल्या संकेतस्थळावर उपलब्ध केले आहेत.

या पर्यायांद्वारे सर्व सुजाण नागरिकांनी आपला अभिप्राय अवश्य कळवावा असं कळकळीचं आवाहन समितीचे अध्यक्ष, ज्येष्ठ शिक्षणतज्ञ डॉक्टर नरेंद्र जाधव यांनी केलं आहे. त्याविषयीचा हा वृत्तांत....

**<u>स्क्रीप्ट</u>**

*त्रिभाषा समितीच्या संकेतस्थळाचा पत्ता आहे- tribhashasamiti.mahait.org. या संकेतस्थळार त्रिभाषा धोरण सुनिश्चित करण्यासाठी लोकांच्या अपेक्षा जाणून घेण्याकरिता प्रश्नावलीचे चार पर्याय दिले आहेत. मराठी, इंग्रजी आणि हिंदी माध्यम तसंच ही तिन्ही माध्यमं वगळता इतर माध्यमाच्या शाळांसाठी अशा या चार प्रश्नावली आहेत. यापैकी एका प्रश्नावलीचा पर्याय नागरिकांनी निवडायचा आहे. त्याची उत्तरं देण्यासाठी बहुविध पर्याय दिले आहेत. त्यापैकी योग्य पर्यायाची निवड करून ते सादर करायचे आहेत. तसंच मतावलीमध्ये विविध संस्था, संघटना, शिक्षक, मुख्याध्यापक, प्राचार्य यांचे अभिप्राय जाणून घेण्यासाठी विचारण्यात आलेल्या प्रश्नांची सविस्तर उत्तरं देऊन ती भरायची आहे असं समितीचे अध्यक्ष डॉक्टर नरेंद्र जाधव यांनी या निवेदनाद्वारे कळवलं आहे. आकाशवाणीच्या बातम्यांसाठी, मनोज क्षीरसागर, पुणे.*

**<u>नामांकन</u>**

रत्नागिरी जिल्ह्यातील सर्व 19 पोलीस ठाणी, चार उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयं आणि रत्नागिरी मोटर परिवहन विभाग या कार्यालयांना आयएसओ 9001:2015 प्रमाणित स्मार्ट पोलीस स्टेशन मानांकन प्राप्त झालं आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक नितीन बगाटे यांच्या हस्ते काल या प्रमाणपत्रांचं वितरण करण्यात आलं. महाराष्ट्र पोलीस कायद्यानुसार कायदा सुव्यवस्था राखणं, लोकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करणं, नागरिकांना विविध सेवा प्रदान, पोलिसांचं प्रशिक्षण, त्यांची कार्यक्षमता, संघ म्हणून काम करण्याची त्यांची इच्छा अशा निकषांद्वारे पडताळणी केल्यानंतर हे मानांकन देण्यात आलं आहे.

**<u>अनुसूयाबाईकाळे स्मृतीसदनउद्घाटन</u>**

आपला समाज इतिहास विसरतो, त्यामुळंच कधी काळी आपल्याला गुलामगिरीत जावं लागलं होतं. म्हणून परिवर्तनवादी व्यक्तींचा इतिहास विसरू नका, असं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल नागपूर इथं केलं.

अनुसूयाबाई काळे स्मृती सदन आणि नोकरदार महिलांच्या नूतनीकृत वसतिगृहाचं उद्घाटन करताना ते बोलत होते. देशाच्या पहिल्या संसदेत नागपूरचं प्रतिनिधित्व करणाऱ्या, आणि त्याचबरोबर जातीयतेविरोधातील लढ्यासाठी आमदारकीचा राजीनामा देणाऱ्या अनुसूयाबाई यांनी महिलांच्या उत्थानासाठी, त्यांना स्वतःच्या पायावर उभं करण्यासाठी केलेले परिश्रम प्रेरणादायी असल्याचं मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितलं.

**<u>जी.प.बालसाहित्य महोत्सव</u>**

पुणे जिल्हा परिषद आणि अमरेंद्र भास्कर मराठी बालकुमार साहित्य संस्थेच्या सहकार्यानं आयोजित बालसाहित्य महोत्सव नुकताच पुण्यात पार पडला. जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थ्यांसाठी पहिल्यांदाच एवढ्या मोठ्या प्रमाणावर साहित्य संमेलन घेण्यात आल्यानं हा उपक्रम ऐतिहासिक ठरला. महोत्सवाची सुरुवात 30 शाळांमधल्या 600 विद्यार्थ्यांच्या ग्रंथ-दिंडीनं झाली. चर्चा, परिसंवाद, काव्यवाचन, यासह जिल्हा परिषद शाळांमधील एक हजारपेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी साकारलेल्या साहित्यकृतींचं भव्य प्रदर्शनदेखील आयोजित करण्यात आलं होतं. विविध प्रकाशनसंस्थांनी या महोत्सवात सहभाग घेत बालसाहित्याचा समृद्ध आणि विस्तृत संग्रह सादर केला.

**<u>दासगणू महाराज पुरस्कार</u>**

पुण्यातील श्रीराधादामोदर प्रतिष्ठानतर्फे दरवर्षी दिला जाणारा संतकवी श्री दासगणू महाराज पुरस्कार यावर्षी वाराणसी इथले विद्वान वेदशास्त्रसंपन्न गणेश्वरशास्त्री द्रविड यांना जाहीर झाला आहे. धार्मिक आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल त्यांना हा पुरस्कार जाहीर झाला असून सव्वा लाख रुपये आणि मानचिन्ह असं त्याचं स्वरूप आहे. पंढरपूरमध्ये उद्या श्री दासगणू महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या वाड्यात हा पुरस्कार प्रदान सोहळा होणार आहे.

पुणे आणि लातूर विभागात यावर्षी दहावीच्या परीक्षेत संस्कृत विषयात प्रथम क्रमांक मिळवलेल्या विद्यार्थ्यांना श्री दासगणू महाराज पारितोषिक देऊन यावेळी गौरवण्यात येणार आहे.

**<u>क्रिकेट</u>**

कोलकात्यात इडन गार्डन इथं सुरु असलेल्या भारत-दक्षिण आफ्रिका पहिल्या कसोटी क्रिकेट सामन्यात मैदानाची धावपट्टी निर्णायक ठरत आहे.  दुसऱ्या दिवसअखेर दोन्ही संघांचे पहिले डाव संपून पाहुण्यांच्या दुसऱ्या डावात 7 गडी बाद 93 धावा झाल्या आहेत. त्यांनी दुसऱ्या डावात 63 धावांची आघाडी घेतली आहे. पाहुण्यांचे उर्वरित तीन गडी झटपट बाद करुन ही कसोटी जिंकण्याची संधी भारताला निर्माण झाली आहे. धावसंख्या-पहिला डाव-दक्षिण आफ्रिका 159 धावा, भारत-189 धावा.

**<u>हवामान</u>**

राज्यात आज सर्वत्र हवामान कोरडं राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.